# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रसेनोट क्र- ११०-२३** **दिनांक ०५/०४/२०२३**

**थायलैंड येथे कंपनीत नोकरी देण्याची बतावणी करुन पुशिंगच्या माध्यमातुन म्यानमार येथे कंपनीत नोकरीसाठी पाठवलेल्या नागरिकास सुखरूप भारतात परत आणण्यास भरोसा सेलला यश.**

भरोसा सेल येथे महिला नामे श्रीमती परवीन शेख, वय ५० वर्षे रा. उत्तन, भाईंदर प यांनी केलेल्या तक्रारी अर्जामध्ये त्यांचा मुलगा शहजान खान, वय २५ वर्षे यास ठाणे येथील एजंटने थायलैंड येथे नोकरी मिळवून देतो अशी बतावणी करुन दिनांक ०४/११/२०२२ रोजी प्रथम चेन्नई एअरपोर्ट येथे पाठवून टुरिस्ट व्हिजाच्या माध्यमातून थायलैंड येथे पाठवले. तदनंतर थायलैंड येथून पुशिंगच्या माध्यमातून दिशाभूल करुन म्यानमार येथे पाठवले. म्यानमार येथील एका कंपनीमध्ये त्याला कॉलींग करण्याचे काम दिले होते. दिलेले टारगेट पुर्ण झाले नाही तर अमानुष छळ केला जात व मोबाईल काढून घेण्यात आला होता. २८ दिवसानंतर शहजानला मोबाईल अर्ध्या तासाकरिता दिला गेला होता. त्यावेळी त्याने अर्जदार महिला परवीन यांना फोन करून त्याची फसवणूक झाली असून थायलेंड येथे नोकरी न देता पुशिंगच्या माध्यमातून त्याला म्यानमार येथे नेल्याचे सांगितले. शहजान याचेसोबत कोणताही संपर्क होत नसल्यामुळे तो नक्की कुठे आहे व कोणत्या परिस्थितीमध्ये आहे याबाबत तक्रारदार यांना काहीएक माहिती नव्हती. परदेशात कामानिमित्त गेलेले व अडकून पडलेल्या नागरिकांना भरोसा सेल, भाईंदर यांनी मदत केल्याचे त्यांना माहित होते. त्यामुळे त्यांच्या मुलाला सुखरुप परत भारतात आणण्यासाठी त्यांनी भरोसा सेल येथे तक्रारी अर्ज दिला होता.

भरोसा सेल येथे परवीन खान यांनी दिलेल्या तक्रारी अर्जाची माहिती वरिष्ठांना देवुन त्यांचे मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे भरोसा सेलच्या सपोनि श्रीमती तेजश्री शिंदे यांनी भारतीय दूतावास यांना संपर्क साधून त्यांचे मदतीने शहजान खान यास दिनांक ३०/०३/२०२३ रोजी सुखरुप भारत देशात आणण्यात आले. मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाचे वतीने नागरिकांना आव्हान करण्यात येते कि, परदेशात नोकरी देतो अशी खोटी बतावणी करुन पुशिंगच्या माध्यमातून बेकायेदशीररित्या मुलांना परदेशात पाठवण्याच्या घटना घडत आहेत त्यामुळे नागरिकांनी सदर घटणेबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली भरोसा सेलच्या स.पो.नि. श्रीमती तेजश्री शिंदे, पो.हवा. सचिन तांबवे, म.पो.अं. आफ्रिन जुन्नैदी यांनी केली आहे.

-----oooo-----